Impact Factor - 3.452 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March - 2018

SPECIAL ISSUE-XLVI

# आदिवासी (Tribal)



अतिथी संपादक :

**डॉ.ज्योत्स्ना सोनखासकर**

प्राचार्या,

म.वि.प्र.समाजाचे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला,

भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सिन्नर जि. नाशिक (महाराष्ट्र)

मुख्य संपादक :

**डॉ. धनराज धनगर**

सहा. प्राध्यापक

म.गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,

येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)

विशेषांक कार्यकारी संपादक : प्रा. ए.ए.पोटे, प्रा. आर.डी. आगवणे, सिन्नर, जि. नाशिक (महाराष्ट्र)

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 46 : आदिवासी (Tribal)
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018

# नाशिक जिल्हातील आदिवासी नेतृत्वाची आदिवासींच्या विकासातील भूमिका

प्रा. डॉ. प्रल्हाद दुधाने
एम ए सेट एम.फील. पीएच.डी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कां. व. ना. नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नाशिक
मो. 9860219885, pralhaddudhane@yahoo.com

महाराष्ट्रातील नाशिक जिल्हयाकडे शेतीच्या बाबतीत एक विकसीत जिल्हा म्हणून ओळखला जात असला तरी, त्या जिल्हयातील इगतपूरी, त्रंबकेश्वर, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण, सटाणा या व इतर भागातील अनुसूचित जमाती मात्र मागासलेल्या आहेत. त्यातील काही जमाती विकासाच्या प्रक्रियेत आलेल्या आहेत. यात राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थेतील आदिवासी राजकीय नेतृत्वाची भूमिका नाकरता येत नाही. असे असले तरी या भागातील अनुसूचित जमातींमध्ये आजही अनेक अंधश्रध्दा प्रचलित आहेत. या अनुसूचित जमाती निसर्गपूजक आहेत. वाघ, साप, पर्वत, चंद्र, सुर्य, वेताळ, आसरा, खंडेराय यांची ते पुजा करतात. शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे व या पारंपारीकतेमुळे मागसलेपणा दिसून येतो. या भागात वर्षातले आठ महिने रोजगारही मिळत नाही. त्यामुळे विवाहसुध्दा करण्यासाठी पैसे नसल्या कारणामुळे पेन (साखरपुडा) करून वैवाहिक जीवनास सुरुवात केली जाते. आदिवासींच्या विकासासाठी राज्यघटनेच्या ४६व्या कलमात काही तरतूदी करण्यात आल्या आहेत. तसेच कलम ३३० व ३३२ नूसार केंद्रीय व राज्य विधीमंडळात आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे.

देषाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाली. त्यांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभाग शबरी वित्त व विकास महामंडळ, राज्य आदिवासी सहकारी विकास महामंडळ आणि त्याच बरोबर जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्याकडूनही त्यांच्यासाठी विविध योजना राबविल्या जात असतात.

आदिवासी राजकीय नेतृत्व २४३ (घ) (१) (ख) नूसार ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद या पंचायत राज संस्थेमधून आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यरत आहेत. पण तरीही ते अपयशी ठरले आहेत. कारण आदिवासींचा पाहिजे त्या प्रमाणात विकास झालेला नाही.

नाशिक जिल्हयात प्रामुख्याने इगतपूरी, त्रंबकेश्वर, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण, आणि सटाणा या आदिवासी भागाचा समावेश होतो. या सात तालूक्यात मिळून चार आदिवासींचे विधानसभेचे राखीव मतदार संघ आहेत. तसेच या भागात आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आहे आणि त्यांच्या विकासासाठी ग्रामपंचायत सदस्यांपासून लोकसभेच्या खासदारांपर्यंत त्यांचे नेतृत्व आहे. तरी सुध्दा आदिवासींचा पाहीजे त्या प्रमाणात विकास झालेला नाही.

आदिवासींच्या मागासलेपणाला अनेक कारणे कारणीभूत आहेत. त्याची कारणमीमांसा नाशिक जिल्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि कल्याणकारी योजणांची अंमलबजावणी या पीएच.डीच्या प्रबंधामध्ये सविस्तर केलेली आहे. यामध्ये नाशिक जिल्हयातील आदिवासी बहुल भागातील म्हणजेच आदिवासींसाठी विधान सभेचे राखीव असलेले मतदार संघ इगतपूरी, दिंडोरी, सुरगाणा , कळवण आणि सटाणा त्याच बरोबर दिंडोरी लोकसभा या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बारा ग्रामपंचायतीच्या आदिवासी

सदस्य आणि पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य यांच्या गट, गण आणि त्या गणाच्या अंतर्गत अस एकूण गावा पैकी आठ गावांची निवड करुन त्याच गावातील आदिवासी नागरीकांच्याही मुलाखती आदिवासी नेतृत्व आणि आदिवासी समाज यांना परस्पर विरुध्द आणि परस्पर पुरक विकासाच्या आढावा घेतला असता त्यात पुढील प्रमाणे वास्तव माहीती प्राप्त झाली आहे.

नाशिक जिल्हयात स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासी नेतृत्वाने बऱ्याच मोठया प्रमाणात प्राप्त केलेली होती आणि त्यानंतरही फक्त आरक्षणात बदल थोडा फार झालेला आहे. परंतू एकूण तेवढेच आहे.

राजकीय सत्ता ही सामाजिक विकासाची चावी असते. सत्तेशिवाय सामाजिक विकास होउ शकत आदिवासी समाजाच्या विकासासाठी सुध्दा राजकीय सत्ता आवश्यक आहे. नाशिक जिल्हयातील आ राजकीय नेतृत्वाची माहिती २००७ ते २०१२ कालावधीत घेतली असता. ती खालील प्रमाणे दिसून येते.

पंचायत राज्य व्यवस्थेतील सदस्यांनी धारण केलेल्या पदांची माहिती.

| अ. क्रं. | पद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सरपंच | ०८ | १४.३ |
| २ | ग्रामपंचायत सदस्य | ३३ | ५८.६ |
| ३ | उपसरपंच | ०२ | ०३.६ |
| ४ | पंचायत समितीचे सदस्य | ०३ | ०५.४ |
| ५ | पंचायत समितीचे सभापती | ५ | ०८.६ |
| ६ | जिल्हापरिषद सदस्य | ०४ | ०७.१ |
| ७ | जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती | ०१ | ०१.८ |
| | | ५६ | १०० |

RESEARCHJOURNEY

वरील तक्त्याच्या आधारे प्रस्तूत संशोधना साठी निवडण्यात आलेल्या प्रातिनिधीक नमुण्याच्या अ असे स्पष्ट होते की, स्थानिक स्वराज्य संस्था या ग्रामिण विकासाची प्रत्यक्ष जनतेशी निगडीत असतात संस्थातील आदिवासींच्या राजकीय नेतृत्वाची टक्केवारी ग्रामपंचायत सदस्यपदामध्ये सर्वाधीक म्हणजे टक्के आहे. सरपंच पद धारण केलेल्यांची त्या खालोखाल १४.३ टक्के आहे. पंचायत समिती सभापती ८.६ टक्के आहे. जिल्हापरिषद सदस्य ७.१ टक्के आहेत. पंचायत समिती सदस्य ५.४ टक्के उपसरपंचपदी ३.६ टक्के सदस्य आहेत तर जिल्हापरिषद समाजकल्याण सभापतीपदी १.८ टक्के हे प्र आहे.

याशिवाय दिंडोरी लोकसभा, आणि याच भागातील आदिवासींसाठी इगतपूरी विधान सभा, सु विधानसभा, सटाणा विधानसभा, दिंडोरी विधानसभा हे मतदार संघ आदिवासींसाठी राखीव आहेत. आदिवासी खासदार आणि आमदार संबंधित समाजाचे नेतृत्व करतात.

**आदिवासींच्या विकासातील आदिवासी नेतृत्वाची भूमिकाः-**

आदिवासी कल्याणबाबत राजकीय नेतृत्वाच्या सूचना :

आदिवासींचा विकास व्हावा, त्यांचे कल्याण व्हावे या दृष्टीकोणातून नाशिक जिल्हयातील आदि राजकीय नेतृत्वाला आदिवासींच्या संदर्भात आपल्या सूचना विचारल्या असता त्यांनी पुढील प्रमाणे माहिती

**आदिवासी कल्याणाबाबत सूचना**

| अ.क्रं. | आदिवासी कल्याणाबाबत सूचना | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बदलत्या काळानूसार योजना बदलल्या पाहिजेत | १० | १७.६ |
| २ | आदिवासींचे मुलभूत प्रश्न सुटले पाहिजेत | २४ | ४२.७ |
| ३ | शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे | ०६ | १६.१ |
| ४ | रोजगार प्रत्येकाला मिळाला पाहिजे | १० | १७.६ |
| ५ | आधुनिक पध्दतीने शेती केली पाहिजे | ०१ | ०१.८ |
| ६ | निश्चित सांगता येत नाही | ०२ | ०३.६ |
| | एकूण | ५६ | १०० |

वरील तक्त्यावरुन आदिवासींच्या विकासात कोणत्या घटकांची कमतरता आहे आणि त्यांना कशाची गरज आहे. याची सविस्तर माहिती मिळते.

आदिवासी राजकीय नेतृत्व आदिवासींच्या विकासा बाबत कशी भूमिका घेते त्याची माहिती नाशिक जिल्हयातील आदिवासी भागातील नागरीकांना मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून विचारली असता ७८.१ टक्के आदिवासी असे म्हणाले की, आदिवासी नेता आदिवासींच्या अडीअडचर्णींना धावून जात नाही तर २१.६ टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व आदिवासींच्या अडिअडचर्णींना धावून जातो.

आदिवासी नेतृत्व आदिवासींच्य अडिअचर्णींना का धावून जात नाही याचीही माहिती त्याच मुलाखत अनुसूची द्वारे मिळविण्यात आली असता आदिवासी नेतृत्व सक्षम नसल्याची कारणे खालील प्रमाणे मिळाली.

**आदिवासी नेता सक्षम नसल्याची कारणे.**

| अ.क्रं. | आदिवासी नेतृत्व सक्षम नसण्याची कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | परावलंबी नेतृत्व | ६४ | ६६.७ |
| २ | मस नेतृत्वाचा अभाव | १२ | १२.५ |
| ३ | उच्चविद्याविभूषित नाही | ११ | ११.५ |
| ४ | आर्थिक दृष्टया दुर्बल | ०६ | ६.४ |
| ५ | एकूण | ६६ | १०० |

वरील तक्त्यावरुन आदिवासी नागरीकांच्या आदिवासी नेतृत्वाकडून आदिवासींच्या विकासासाठी बऱ्याच अपेक्षा आहेत. नाशिक जिल्हयातील आदिवासी समाजामध्ये आदिवासी राजकीय नेतृत्व आदिवासींचे प्रश्न चांगल्या प्रकारे सोडवू शकतील असे नाही. आदिवासींना आपला नेता उच्च विद्याविभूषित हवा आहे. आणि त्याने सक्षमपणे आदिवासींचे नेतृत्व केले पाहिजे. आदिवासिंचे प्रश्न तळमळीने सोडविण्याची त्याची तयारी असली पाहिजे. नेतृत्व हे दुर्बल, परावलंबी असता कामा नये. आदिवासी नेता म्हणजे मास लिडर असला पाहिजे. आणि आदिवासींना अन्याय, अत्याचार झाला असता त्यांनी आदिवासींच्या मदतीला धावून गेले पाहिजे. प्रस्थापित राजकीय नेतृत्वाच्या हातचे बाहूले बनता कामा नये. अशा प्रकारच्या अपेक्षा आदिवासी समाजाकडून आदिवासी नेत्यांकडे केल्या जातात. त्याचे पालन आदिवासी राजकीय नेतृत्वाने केले तर निश्चीतच आदिवासींच्या विकासाला हातभार लागेल यात शंका नाही. परंतू जातीय राजकारण हा त्यातील मोठा अडसर आहे तो आधी कमी झाला पाहिजे.

संदर्भ :-


१. डॉ. सौ. षैलजा देवगांवकर, डॉ. ष गो. देवगांवकर, आदिवासी विष्व आनंद प्रकाषन नागपूर-
२. आर.सी.सी वर्मा अुवाद मनोज वामन श्रीसागर, भारतीय जमाती काल, आज आणि
प्रकाषन विभाग माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार.
३. डॉ. गोविंद गारे, महाराश्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाषन विजयानगर, पुणे
द्वितीय आवृत्ती, २००२.
४. गुरुनाथ नाडगोंडे, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाषन विजयानगर, पुणे ३०, द्विती
आवृत्ती, २००३.
५. प्रा. डॉ. दुधाने पी.डी. ''नाषिक जिल्हयातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि कल्याण
योजनांची अंमलबजावणी'' (अप्रकाषित पीएच.डी षोध प्रबंध नोव्हेंबर २०१३ डॉ. बा.आ.म
औरंगाबाद ).